CMYK

**जुगारात जिंकलेल्या १७ हजारांसाठी दोन मित्रांनी केला तरुणाचा खून: मृतदेह फेकला नाल्यात** >> पान 2

**राजकोट किल्ल्यावरील शिवरायांच्या पुतळ्यालगतचा भाग खचला, निकृष्ट दर्जाचे बांधकाम; शिवप्रेमींत संताप** >> पान 3

**जल जीवन मिशन अंतर्गत प्राप्त झालेल्या तक्रारी निकाली काढा** >> पान 4

**सुविचार**

नेहमी शिकण्याची तयारी ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : **देविदास खनपटे** मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 275 ■ सोमवार, दि. 16 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'मला हिंदुस्थानी, मुस्लीम असल्याचा गर्व' : आमिर खान

आतील पान

# इंद्रायणी पूल कोसळला, चौघांचा मृत्यू

## निष्काळजीपणाचे बळी की प्रशासनाचा बेजबाबदारपणा?



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी : रविवार पुण्याच्या मावळमधील कुंडमळ्याजवळ पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांसाठी घातवार ठरला. कुंडमळ्याजवळील इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळला आणि या दुर्घटनेत चार पर्यटकांचा मृत्यू झाला. मृतांत एका मुलाचाही समावेश आहे. आतापर्यंत एकूण ५० जणांना वाचवण्यात यश आलं आहे. रविवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली असून यावेळी पुलावर १०० हून अधिक पर्यटक अल्याची माहिती आहे.**

सुट्टीचा दिवस असल्याने इंद्रायणी नदीवरचा प्रसिद्ध कुंडमळा धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची तुफान गर्दी झाली होती. पण दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास नदीवरचा हा कमकुवत पूल कोसळला आणि एकच हाहाकार उडाला.

मावळच्या शेलारवाडी आणि बेगडेवाडीला जोडणारा हा पूल अनेक वर्षांपासून धोकादायक बनला होता. तसा बोर्डही साधारण दोन वर्षांपूर्वी प्रशासनाकडून लावण्यात आला होता. पण याकडे ना इथे येणाऱ्या पर्यटकांनी गांभिर्यानं पाहिलं ना प्रशासनानं काळजी घेतली. अखेर ज्याची भीती होती तेच रविवारी झालं. पूल कोसळला आणि त्यावर उभे असलेले अनेक जण वाहून गेले.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांसह एनडीआरएफच्या तुकड्या आणि इतर बचावपथकं दाखल झाली आणि तातडीनं बचावकार्य हाती घेण्यात आलं. दुर्दैवानं या दुर्घटनेत काही पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला.

दुर्घटनेची माहिती मिळताच अनेक लोकप्रतिनिधी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी गिरीश महाजनांनी गर्दीमुळेच हा पूल कोसळल्याचं म्हटलं. पण महत्वाची बाब ही की पूल जीर्ण झालेला असताना इथल्या प्रशासनानं इथून नागरिकांना ये-जा



करण्याची परवानगी का दिली?

या पूल दुर्घटनेत काही जणांचा बळी गेला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. अंधार पडल्यानंतर बचावकार्यात अडथळे येत होते. >> पान २

## पुणे पूल अपघात प्रकरण : पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाहांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना फोन, घटनेचा घेतला आढावा



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पुण्यातील कुंडमळ्याजळील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. रविवारी दुपारी ही घटना घडली असून २० ते २५ जण नदीतून वाहून गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून मृतांच्या आकड्यात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही घटना घडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेचा आढावा घेतला. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सगळ्या जुन्या पुलाचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र घटना घडल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करुन घटनेचा आढावा घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या सायप्रस या देशाच्या भेटीवर आहे. मात्र पुण्यातील मावळमध्ये घडलेल्या पूल अपघातामुळे सगळ्यांनाच धक्का बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कॉल केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनेचा आढावा घेतला. >> पान २

## जुन्या पुलांचं स्ट्रक्चरल ऑडिट करा



**सातारा/प्रतिनिधी :** मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरचा जूना पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. तसंच पूल दुर्घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. ते दरे (ता. महाबळेश्वर) इथं माध्यमांशी बोलत होते.

### पूल दुर्घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आदेश

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ''मावळ तालुक्यातील कुंडमळा हे एक महत्त्वाचं पर्यटनस्थळ आहे. त्या ठिकाणच्या इंद्रायणी नदीवरील जुना लोखंडी पूल पडल्यामुळे झालेल्या दुर्घटनेची माहिती >> पान २

## पुण्यातील सराईत गुंडाचा सोलापुरात इन्काउंटर

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** पुण्यातील गुंडाचा सोलापुरात इन्काऊंटर करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार शाहरुख उर्फ अट्टी रहीम शेख वय २३ असे या सराईत गुंडाचे नाव आहे.शाहरुख उर्फ अट्टी शेख याच्यावर पुणे पोलिसात अनेक गुन्हे दाखल आहेत. काही दिवसांपासून तो सोलापुरातील लांबोटी गावाजवळ लपळ्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याला अटक करण्यासाठी पुणे गुन्हे शाखेचे पथक मध्यरात्री लांबोटी येथे आले होते. लपलेल्या घरावर छापा मारताना आरोपी शाहरुख शेख यांने पोलिसांवर गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती आहे.

### सोलापुरातल्या लांबोटी जवळ पुणे गुन्हे शाखेची कारवाई



या गोळीबारला प्रत्युत्तर देताना शाहरुख उर्फ अट्टी शेख गंभीर जखमी झाला. गंभीर अवस्थेत त्याला सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. >> पान २

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त, ७ जणांचा मृत्यू



**डेहराडून/वृत्तसंस्था :** उत्तराखंडच्या केदारनाथ धाममध्ये पुन्हा एकदा मोठी दुर्घटना घडली आहे. रविवारी केदारनाथ मार्गावर एक हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह एकूण ७ जण असल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झालाय. मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले. ही दुर्घटना गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायणदरम्यान घडली. >> पान २

### यवतमाळचं कुटुंब उद्ध्वस्त, फक्त मुलगाच वाचला!



**यवतमाळ/प्रतिनिधी :** उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथला जाणारे हेलिकॉप्टर सकाळी ५.२० वाजता गौरीकुंडच्या जंगलात कोसळले. या अपघातात एकूण ७ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये महाराष्ट्रातील >> पान २

## दहशतवाद संपवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीं करत आहेत

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** जनतेला पायाभूत सुखसुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच दहशतवाद आणि नक्षलवाद संपवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीं करत आहेत, असं मत उच्च तंत्र शिक्षण मंत्री आणि सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. सांगली जिल्ह्यातील मिरज येथे मंत्री चंद्रकांत पाटील हे प्रसार माध्यमांशी बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, आमदार सुधीर दादा गाडगीळ आणि ज्येष्ठ

### मंत्री चंद्रकांत पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती



नेते मकरंद देशपांडे हे उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले की, राहुल गांधी आणि संजय राऊत म्हणजे फक्त प्रश्न उपस्थित करणारे आणि पळून जाणारे नेते आहेत. >> पान २

## इराण आणि इस्त्रायलमध्ये गेल्या ४८ तासांपासून घनघोर संघर्ष सुरुच



**मुंबई/प्रतिनिधी :** शनिवारी रात्री उशिरा इराण आणि इस्रायलने पुन्हा एकदा एकमेकांवर अनेक क्षेपणास्त्र डागले. दोन्ही देशांमधील संघर्ष गेल्या ४८ तासांपासून सुरू आहे. इस्रायलने तेहरानमधील संरक्षण मंत्रालयाला लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. याशिवाय तेहरान आणि बुशहरमधील तेल डेपो आणि गॅस रिफायनरीसह १५० हून अधिक लक्ष्यांवर हल्ला करण्यात आला आहे. दोन दिवस चाललेल्या युद्धात आतापर्यंत १३८ इराणी मारले गेले आहेत, ज्यात ९ अणुशास्त्रज्ञ आणि २० हून अधिक इराणी कमांडर आहेत. याशिवाय ३५० हून अधिक जखमी झाले आहेत. >> पान २

## डॉ. सदानंद मोरे यांच्यासोबत आमदार सिध्दार्थ खरात यांची पुण्यात चर्चा; सांस्कृतिक संवादाची वीण घट्ट

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** वारकरी चळवळीच्या प्रगल्भ वारशाला सामाजिक सुधारणा व राजकीय जाणिवांची जोड देणारी एक महत्त्वपूर्ण भेट नुकतीच पुण्यात घडली असून मेहकर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी संत तुकाराम महाराजांचे थोर वंशज आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांची त्यांच्या पुणे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली आहे.सदर भेट सांस्कृतिक संवादाची वीण घट्ट करणारी ठरली.



या भेटीत महाराष्ट्र धर्माची संकल्पना, संतांचे समाज प्रबोधनातील योगदान, तसेच आजच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर सखोल चर्चा झाली. संतांनी जसा महाराष्ट्र धर्म म्हणजेच अध्यात्म, दया, करूणा, समता आणि बंधुभाव मांडला, त्याचा आजच्या काळाशी संबंध लावण्याचा प्रयत्न दोघांनीही केला. त्याचबरोबर शिव, शाहू, फुले, आंबेडकरी चळवळीचा परस्परांशी असलेला पूरक संबधाची सुद्धा चर्चा केली. डॉ. मोरे यांनी आधुनिक महाराष्ट्रात संतविचारांची त्याच बरोबर शिव शाहू फुले आंबेडकरी चळवळीची समांतर गरज अधिक तीव्रतेने असल्याचे जाणवते, असे नमूद करत या दोन्ही मौल्यवान चळवळींचे योगदान समजावून सांगितले. या संवादातून आमदार सिद्धार्थ खरात यांनी असा विश्वास व्यक्त केला की, ''सामाजिक सलोखा आणि पारदर्शक राजकारणासाठी संतविचार व पुरोगामी स्वरूपाची शिव,शाहू,फुले, आंबेडकरी चळवळ हीच खरी प्रेरणा बनू शकतात.'' असे मत व्यक्त करीत ही भेट राजकीय नसून सांस्कृतिक संवादाची वीण घट्ट करणारी होती, अशी भावना आमदार खरात यांनी व्यक्त केली. यावेळी ''तुकाराम महाराजांचे वंशज व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या भेटीने महाराष्ट्र धर्मावर भर दिला.



CMYK

# जुगारात जिंकलेल्या १७ हजारांसाठी दोन मित्रांनी केला तरुणाचा खून: मृतदेह फेकला नाल्यात

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** जुगारात जिंकलेले १७ हजार लुटण्यासाठी मित्राचा खून केल्यानं मोठी खळबळ उडाली. ही धक्कादायक घटना परतवाडा इथल्या वन विभागाच्या परिसरात उघडकीस आली. विशेष म्हणजे तरुणाकडून १७ हजार घेतल्यानंतर या तरुणाचा मृतदेह नाल्यात फेकून देण्यात आला. अरुण धाडसे असं खून करण्यात आलेल्या तरुणाचं नाव आहे. तर फैजान खान नूर खान आणि अय्यान खान रिजवान खान अशी मारेकऱ्यांची नावं आहे.

जुगारात जिंकलेल्या पैशासाठी मित्राचा खून : सागर, अय्यान, फैजान आणि अन्य सात ते आठ जण बहिरमजवळ निंभोरा इथं सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर जुगार खेळण्यासाठी १३ जूनला गेले होते. या ठिकाणी जुगार खेळताना सागर काही रक्कम जुगारात जिंकला. ही बाब फैजान आणि अय्यानला सुध्दा माहित होती. दरम्यान जुगार खेळून परतवाडा इथं परत येत असताना सागर हा अय्यान आणि फैजानच्या दुचाकीवरच बसून येत होता. दरम्यान मार्गातच लागणाऱ्या मुगलाईपुरा भागात हे दोघं सागरला घेवून गेले. यावेळी दुचाकीवर सागर मधात बसला होता. धावत्या दुचाकीवर अय्यान आणि फैजानपैकी एकानं दुपट्ट्यानं त्याचा गळा आवळला. त्यावेळी सागरनं त्यांचा प्रतिकार केला. म्हणून तिघंही दुचाकीवरुन खाली पडले. त्यानंतर अय्यान आणि फैजान यांनी सागरच्या डोक्यावर विट आणि दगडानं मारहाण केली. या मारहाणीत सागरचा घटनास्थळी मृत्यू झाला. मृत्यूनंतर त्याचा मृतदेह या दोघांनी परतवाड्यातील वनविभागाच्या डेपोमागून वाहणाऱ्या एका नाल्यात फेकून दिला होता.



शनिवारी सांयकाळच्या सुमारास एक अनोळखी मृतदेह नाल्यात असल्याची माहिती परतवाडा पोलिसांना मिळाली. पोलीस घटनास्थळी गेले, मृतदेहाची पाहणी करुन ताब्यात घेतला. त्यावेळी मृतक तरुणाची ओळख पटली नव्हती. मात्र काही तासातच पोलिसांनी ओळख पटवून दोन्ही आरोपींना अटक केली.

## चिंताजनक विमान दुर्घटना

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ – ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. या भीषण अपघाताने सर्वांचेच मन हेलावले. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेनंतर संपूर्ण जगभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात विमान दुर्घटना घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा बळी गेल्याची ही पहिली घटना नाही याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि त्यात अनेक प्रवाशांचा जीव गेला आहे. गेल्याच वर्षी दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला पण अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही. सरकारने या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला आहे. हा चौकशी आयोग या अपघाताची सखोल चौकशी करील त्यामुळे लवकरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमवावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता विजय रूपाणी यांच्या नावाचीही भर पडली आहे. तीन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

पान १ वरून...

## इंद्रायणी पूल कोसळला

मात्र तरीही वाहून गेलेल्यांचा शोध सुरू होता. हा पूल जुना झाला हे माहीत असूनही, तशा सूचनाही देऊनही पुलाचा सुरू असलेला वापर... हा झाला नागरिकांचा निष्काळजीपणा. पण पर्यटनस्थळ असलेल्या या गर्दीच्या ठिकाणी लक्ष न देणं, धोकादायक जुन्या पुलाची डागडुजी किंवा नवा पूल न उभारणं हा प्रशासनाचा बेजबाबदारपणा नाही का?

## पुणे पूल अपघात प्रकरण :

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन केला, यावेळी त्यांनी सोशल माध्यमांवर याबाबतची माहिती दिली. ''पुण्यातील तळेगाव इथं इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्यानं खूप दुःख झालं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवर बोलून परिस्थितीची विचारपूस केली. एनडीआरएफ पथकांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली, बचाव कार्यात सहभागी झाले. त्यामुळे अनेकांचे जीव वाचवले. कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती मनापासून प्रार्थना,'' असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

## जुन्या पुलांचं स्ट्रक्चरल

आपण जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतली आहे. घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. ३८ लोकांना एनडीआरएफच्या रेस्क्यू टीमनं सुरक्षितपणे बाहेर काढलं आहे. त्यांना स्थानिक लोक ही मदत करत आहेत, बचाव कार्य सुरू आहे.''

पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून सहा लोक जखमी असल्याची माहितीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. जखमींवर उपचार करून त्यांचा जीव वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जे लोक दुर्घटनेत सापडले आहेत, त्यांना लवकरात लवकर शोधून काढण्यास प्रशासनाचे प्राधान्य असल्याचंही त्यांनी सांगितलं.

''इंद्रायणी नदीवरील पुलांसारख्या सर्व जुन्या पुलांचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले. तसंच या दुर्घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल,'' असंही त्यांनी यांनी स्पष्ट केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवीन महाबळेश्वर गिरिस्थान क्षेत्र आराखड्याचा रविवारी दरे या आपल्या मूळ गावी आढावा घेतला. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच ११५३ चौरस किलोमीटरमध्ये नवीन महाबळेश्वर गिरिस्थान क्षेत्र घोषित करण्यात आलं आहे. यामध्ये महाबळेश्वर, पाटण, जावळी आणि सातारा या चार तालुक्यातील २६५ गावांचा समावेश आहे. महाबळेश्वर विभागामध्ये ३० जावळीत ३३ सातारा २७ आणि पाटणमध्ये ५७ असे एकूण १४७ पर्यटक नंदनवन प्रस्तावित आहेत.

पर्यटकांना सुविधा, सुरक्षिततेबरोबरच प्रवासापासून आरामदायी निवास आणि जेवणाचे पर्याय पर्यटक नंदनवनमधून मिळतील. बामणोली जलपर्यटन केंद्र, कॅम्पेनिंग साईट, साहसी उपक्रम, नौकाविहार, रोपवे अशा ॲक्टिव्हिटीज असणार आहेत. यामध्ये होम स्टे, ॲग्रो टुरिझम योजना २० गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. १४ उद्योग समृद्धी केंद्रांचाही यामध्ये समावेश असेल. तसेच ४४ ग्राम समूह विकसित करण्यात येणार असून पाच एकरावर न्युरोपॅथी सेंटर, शंभर एकरामध्ये आयुष मंत्रालयामार्फत बोटॅनिकल गार्डन देखील प्रस्तावित आहे.

## पुण्यातील सराईत

घटनेनंतर सोलापुरातील सिव्हिल रुग्णालयात वडील आणि पत्नीसह नातेवाईकांनी आक्रोश व्यक्त केला.तर, शाहरुख शेख याचा एन्काऊंटर केल्यानंतर पुणे शहर पोलिसांवर नातेवाईकांनी गंभीर आरोप लावले आहेत. लांबोटी जवळील चंदननगर येथे चकमक करण्यासाठी गेलेल्या पथकाकडून गोळीबार करण्यात आल्याचा शाहरुख शेख याच्या पत्नीने आरोप केला आहे.वडील रहिम शेख यांनी पुणे शहर पोलिसातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शाहरुख शेख यांच्याकडून पैसे घेतल्याचा आरोप केला आहे.तसेच सदर पथकातील पोलीस अधिकाऱ्यांना निलंबन करण्याची नातेवाईकांची मागणी केली आहे.

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर

हेलिकॉप्टर क्रॅश होण्याचे कारण खराब हवामान असल्याचे सांगितले जात आहे.

चारधाम यात्रेदरम्यान वेगवेगळ्या धामांवर हेलिकॉप्टर अनेक वेळा क्रॅश झालेत. तसेच हेलिकॉप्टरचे अनेक वेळा आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. अलीकडेच रस्त्याच्या मधोमध हेलिकॉप्टर क्रॅश लँडिंग करण्यात आले. चारधाम यात्रेच्या सुरुवातीला एक हेलिकॉप्टर क्रॅश झाले, ज्यामध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला. हेलिकॉप्टरमध्ये एका लहान मुलासह ७ जणांचा मृत्यू झालाय. प्रवासी हे उत्तराखंड, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील होते. मृतांमध्ये महाराष्ट्रातील ३५ वर्षीय श्रद्धा राजकुमार जैसवाल आणि ४१ वर्षीय राजकुमार सुरेश जैसवाल यांच्यासह दोन वर्षीय काशी या मुलीचा समावेश आहे. तर विक्रम उत्तराखंड, विनोद देवी (६६) उत्तर प्रदेश, तुस्थी सिंग (१९) उत्तर प्रदेश, कॅप. राजीव सिंग चौहान पायलट यांचाही समावेश आहे.

या अपघातांना लक्षात घेऊन केदारनाथ मार्गावरील हेलिकॉप्टरच्या फेऱ्या कमी करण्यात आल्या होत्या. दररोज ६० हेलिकॉप्टर फेऱ्या कमी करण्यात आल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सरासरी हेलिकॉप्टर दररोज २०० ते २५० फेऱ्या मारतात. सतत होणाऱ्या अपघातांनंतर डीजीसीएने हा निर्णय घेतलाय. डीजीसीएने केदारनाथ मार्गावर कडक नियम लागू केलेत. या नवीन आदेशानुसार, गुप्तकाशी येथून एका तासात हेलिकॉप्टर २ वेळा उड्डाण करतील. ८ तासांत हेलिकॉप्टर एकूण १६ वेळा उड्डाण करू शकतील.

## यवतमाळचं कुटुंब उद्ध्वस्त

तिघांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. हे तिघेही एकाच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे. राजकुमार जयस्वाल यांच्या पत्नी आणि चिमुकल्या मुलीला या अपघातात प्राण गमवावे लागले आहे. हे जयस्वाल कुटुंबीय यवतमाळमधील वणी येथे राहणार आहेत. फक्त त्यांचा मुलगाच बचावला असल्याची माहिती समोर आली आहे.

केदारनाथ धाम अपघातात पायलटचाही मृत्यू झाला आहे. आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर कोसळले आहे. ही दुर्घटना गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायण नारायण दरम्यान घडली. हेलिकॉप्टर कोसळण्याचे कारण खराब हवामान असल्याचे सांगितले जात आहे. हेलिकॉप्टर नोडल अधिकारी राहुल चौबे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह राजवार यांनी हेलिकॉप्टर अपघाताची पुष्टी केली आहे. गौरीकुंडवर गवत कापणाऱ्या नेपाळी वंशाच्या महिलांनी हेलिकॉप्टर अपघाताची माहिती दिली. अपघाताची माहिती मिळताच मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले.

या हेलिकॉप्टर अपघातामध्ये महाराष्ट्रातील तीन जण ठार झाले आहेत. राजकुमार जयस्वाल, श्रद्धा जयस्वाल या दाम्पत्यासह त्यांनी २ वर्षाची काशी राजकुमार जयस्वाल हिचादेखील अपघातात मृत्यू झाला आहे. जयस्वाल कुटुंब काही दिवसापूर्वीच उत्तराखंडमध्ये दाखल झाले होते. आज पहाटेच्या वेळी हेलिकॉप्टरने केदारनाथला जाताना हेलिकॉप्टरचा अपघात झाला. त्यात या कुटुंबावर काळाने घाला घातला.

हेलिकॉप्टर अपघातात जयस्वाल कुटुंब उद्ध्वस्त झाले. पण, त्यांचा मुलगा मात्र यवतमाळमध्येच असल्याने तो बचावला. राजकुमार जयस्वाल यांचा मुलगा विवान हा पांढरकवडा येथील त्याच्या आजोबाकडे थांबला होता. त्यामुळे केदारनाथला जाऊ शकला नाही. त्यामुळेच तो बचावला असल्याचे म्हटले जात आहे. सध्या जयस्वाल कुटुंबाच्या वणी आणि पांढरकवडा येथील निवासस्थानी शोक व्यक्त केला जात आहे.

या चारधाम यात्रेदरम्यान वेगवेगळ्या धामांवर हेलिकॉप्टर कोसळले आहेत. तसेच हेलिकॉप्टरचे अनेक वेळा आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. अलिकडेच रस्त्याच्या मधोमध एक हेलिकॉप्टर कोसळले होते. चारधाम यात्रेच्या सुरुवातीला एक हेलिकॉप्टरही एकदा कोसळले होते, ज्यामध्ये काही लोकांचा मृत्यू झाला होता.

## दहशतवाद संपवण्याचे

असं सांगून चंद्रकांत दादा पाटील पुढे म्हणाले, केवळ शंका उपस्थित करण्याशिवाय राहुल गांधी आणि संजय राऊत यांना दुसरे कोणतेही काम येत नाही. एकमेकांचे शिष्य आणि एकमेकांचे गुरु हे केवळ नकारात्मक टीका करण्यातच आपला वेळ घालवत आहेत.सर्वसामान्य जनतेचा सर्वांगीण विकास करण्याबरोबरच, राम मंदिराची उभारणी, पाकिस्तानला धडा शिकवणे, हे महत्त्वाचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत असून २०४७ पर्यंत भारतला आर्थिक दृष्ट्या महासत्ता करण्याचं उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर आहे. असेही उच्च तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले.

## इराण आणि इस्त्रायलमध्ये

इराणची राजधानी तेहरानसह ७ राज्यांमध्ये हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आली आहे. इराणनेही इस्रायलवर १५० हून अधिक क्षेपणास्त्र डागून प्रत्युत्तर दिले आहे. हल्ल्यात ११ इस्रायली मारले गेले आहेत आणि ३०० हून अधिक जखमी झाले आहेत. इराणने ३ इस्रायली एफ-३५ विमाने पाडल्याचा दावाही केला आहे.

इस्रायल आणि इराणमध्ये ४८ तासांचा संघर्ष, १० पॉईंट्समध्ये महत्त्वाचे मुद्दे

१. इस्रायलनेऑपरेशन रायझिंग लायन सुरू केले. २०० लढाऊ विमानांनी इराणवर हल्ला.

२. इस्रायली कारवाईत ९ इराणी शास्त्रज्ञ आणि २० हून अधिक लष्करी कमांडर मारले गेले.

३. इराणने प्रत्युत्तर दिले, त्याला 'ट्रू प्रॉमिस थ्री' असे नाव दिले. १५० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली.

४. इराणने इस्रायली संरक्षण मंत्रालयावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने मारा केल्याचा दावा केला.

५. नेतन्याहू यांनी पंतप्रधान मोदींशी बोलून परिस्थितीची माहिती दिली.

६. ट्रम्प यांनी धमकी दिली, म्हणाले, इराणने अणु करारावर स्वाक्षरी करावी अन्यथा मोठा हल्ला होईल.

७. इस्रायली राष्ट्रपतींना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

८. इराणने तीन इस्रायली एफ-३५ विमाने पाडल्याचा दावा केला.

९. इस्रायलमध्ये ११ जणांचा मृत्यू. ७ सैनिकांसह ३०० हून अधिक लोक जखमी.

१०. शनिवारी इराण आणि अमेरिका यांच्यातील अणु चर्चा रद्द करण्यात आली.

इराणने इस्रायलवर प्रगत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली

दरम्यान, इराणने इस्रायलवर हल्ला करण्यासाठी एका नवीन आणि प्रगत बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर केला आहे. शनिवार-रविवार रात्री पहिल्यांदाच ते डागण्यात आले. फार्स न्यूजनुसार, या क्षेपणास्त्राचे नाव ''हज कासिम'' आहे, जे माजी कुद्स फोर्स कमांडर कासिम सुलेमानी यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. इराकमध्ये झालेल्या अमेरिकेच्या हल्ल्यात सुलेमानी मारले गेले होते. हज कासिम हे १२०० किलोमीटरच्या पल्ल्याचे घन इंधन मार्गदर्शित बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे. त्यात एक वॉरहेड आहे, जे इस्रायलमध्ये तैनात असलेल्या पॅट्रियट आणि अमेरिकन ढक्अअऊ सारख्या संरक्षण प्रणालींमध्ये प्रवेश करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. ते हायपरसोनिक वेगाने म्हणजेच सुमारे १४८०० किलोमीटर प्रति तास वेगाने हल्ला करते.

इस्रायलने कतारच्या राज्य माध्यम अल-जझीरावर बंदी घातली

इस्रायलने कतारच्या राज्य माध्यम चॅनेल अल-जझीरा न्यूजवर बंदी घातली आहे. अल-जझीरानुसार, ते आता जॉर्डनमधून वृत्तांकन करत आहे. अल जझीरा कतारमध्ये मुख्यालय असलेले आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था आहे.

इस्रायलमध्ये मृत आणि जखमींची संख्या वाढली

रविवारी सकाळी इराणने केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इस्रायली नागरिकांची संख्या ८ झाली आहे. यामध्ये दोन मुले आणि ६ महिलांचा समावेश आहे. तर २०० लोक जखमी झाले आहेत. इराणी हल्ल्यात आतापर्यंत ११ इस्रायली नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, जखमींची संख्या ३०० च्या पुढे गेली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### टोकन पद्धतीनं विठ्ठलाच्या दर्शनास आज पासून सुरुवात




दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** तिरुपती बालाजीप्रमाणे अगदी दिलेल्या वेळेत टोकन पद्धतीनं विठ्ठलाच्या दर्शनास आज सुरुवात करण्यात आली. विठ्ठलाचे टोकन दर्शन आज प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले. सकाळी दहा ते अकरा या एक तासाच्या पहिल्या स्लॉटमधील २०० भाविकांना दर्शनासाठी मंदिरातील विशेष प्रवेशद्वाराने प्रवेश देण्यात आला आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष यांनी प्रथम भाविकाच्या टोकन दर्शनाचे स्कॅन करून त्याला प्रवेश दिला. प्रथम येणाऱ्या दहा भाविकांवर मंदिर समितीच्या वतीने पुष्पृष्टीही करण्यात आली. त्यामुळे भाविकांना आता दिलेल्या वेळेत अगदी सहज आणि सुलभरीत्या एक तासात दर्शन होणार आहे. यापूर्वी विठ्ठलाच्या दर्शना रांगेत तीन तासापासून ते आषाढी यात्रा काळात तीस तासापर्यंत भाविकांना उभे राहावे लागत होते. मात्र हीच वेळ आता टोकन दर्शनामुळे एक तासावर आली.

### दिव्यांग बांधवांनी काढला अशोक चव्हाण यांच्या घरावरती भीक मागून मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या जी.आर प्रमाणे दिव्यांग बांधवांवरती होणारा खर्च होत नसल्यामुळे, आज दिव्यांग कृती संघर्ष समितीच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या घरावरती भीक मागून मोर्चा काढण्यात आला आहे. अशोक चव्हाण यांची भेट घेऊन, अशोक चव्हाण यांनी त्यांना लवकरात लवकर दिव्यांगाचा निधी वाटप केल्या जाईल, अशी गवाई दिल्यामुळे हे आंदोलन संपवण्यात आले. व यापुढे नांदेड जिल्ह्यातील आमदार व खासदार यांना आम्ही सूचना देऊन, देखील आमचा दिव्यांग्याचा निधी खर्च होत नाही, व आमच्याकडे कोणीही लक्ष देत नाही. यासाठी १५ ते ३१ जून पर्यंत आम्ही हे मोर्चे असे चालू ठेवणार. व आमच्या मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये राज्य सरकार मधले मंत्री असो किंवा मग विरोधी पक्षातले नेते यांच्या सभा आम्ही उधळून लावू. असा इशारा दिव्यांग कृती संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

### उजनी दुहेरी जलवाहिनेचे काम अखेर पूर्ण




**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर शहर वासियांसाठी अत्यंत आनंदाची बातमी. सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी धरण ते सोलापूर या दुहेरी जलवाहिनीचे काम अखेर पूर्ण झालं आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूरकर ह्या समांतर जलवाहिनीची प्रतीक्षा होती. जलवहिनीपूर्ण झाल्यानंतर सोलापुरातल्या सोरेगाव येथील जलशुद्धी केंद्रावर उजनी धरणातील पाणी व्यवस्थितरित्या पोहोचले. पाणी पोहोचल्यानंतर सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जलशुद्धीकरण केंद्रावर जातं पाहणी केली. या दुहेरी जलवाहिनी पूर्ण झाल्याचा आनंद यावेळी मंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला. तसेच सोलापूर शहराला आठवड्यात एकदा होणारा पाणीपुरवठा आता आठवड्यातून दोन वेळा करणे शक्य होईल. तसेचं येत्या काळात पाकणी येथे नवीन जलशुद्धिकरण केंद्राची प्रक्रिया देखील लवकर सुरु होईल. त्यानंतर सोलापूरकरांना नियमित पाणी पुरवठा होईल, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

# राजकोट किल्ल्यावरील शिवरायांच्या पुतळ्यालगतचा भाग खचला, निकृष्ट दर्जाचे बांधकाम; शिवप्रेमींत संताप

दैनिक आपला विदर्भ





**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर नव्यानं उभारण्यात आलेल्या शिवरायांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्यालगतची जमीन खचल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. पुतळ्याच्या डाव्या बाजूला मोठं भगदाड पडलं असून त्याठिकाणी जमीन खोलवर खचल्याचं स्पष्टपणे दिसतंय. पुतळा भक्कम असून जमीन खचली आहे. त्यामुळं बांधकाम निकृष्ट दर्जाचं झाल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे.

महिना उलटत नाही, तोच...: मालवण येथील राजकोट किल्ल्यावर नौसेनादिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी करण्यात आली होती. मात्र हा पुतळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केल्यानंतर अवघ्या सहा महिन्यातच कोसळला होता. त्यानंतर या घटनेची महाराष्ट्रापासून दिल्लीपर्यंत सर्वांनीच गंभीर दखल घेत याच ठिकाणी नव्यानं छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य व अश्वारूढ असा नवा पुतळा उभारण्याचा निर्णय राज्य सरकारच्या माध्यमातून घेतला. तसंच या पुतळ्याची संपूर्ण जबाबदारी प्रसिद्ध चित्रकार राम सुतार यांच्याकडे देण्यात आली होती. त्यांनी हा पुतळा अवघ्या सात ते आठ महिन्यातच उभा केला अलीकडेच या पुतळ्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लोकार्पणही करण्यात आलं होतं. मात्र लोकार्पण करून अवघा महिना उलटत नाही, तोच पहिल्याच पावसात या पुतळ्याच्या चबुतऱ्यालगतची जमीन खचल्याची धक्कादायक घटना समोर आलीय.

पुतळ्याच्या डाव्या बाजूला मोठं भगदाड पडलं असून त्याठिकाणी जमीन खोलवर खचल्याचं स्पष्टपणं दिसत आहे. या घटनेमुळं पुन्हा एकदा मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपतींच्या पुतळ्याच्या कामाबाबत साशंकता निर्माण झाली आहे. या संबंधी व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाची धावपळ सुरू झाली. रविवारी सायंकाळी उशिरापर्यंत प्रशासनातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. मात्र त्याबाबत पुढं काय झालं? हे कळू शकलं नाही.

## नागपुरात २४ तासात ३ हत्या: प्रेमसंबंध, गोळीबार आणि चौकीदाराचा खून; शहरात खळबळ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्याची क्राईम कॅपिटल अशी ओळख असलेल्या नागपूरमध्ये काही केल्या गुन्हेगारी थांबण्याचं नाव घेत नाही. २४ तासात शहर आणि ग्रामीण भागात तीन वेगवेगळ्या ठिकाणी तीन जणांची निर्घृण हत्या झाली आहे. या हत्याकांडामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पहिली घटना गोरेवाडा जंगल परिसरात घडली आहे. अमन गजेंद्र ध्रुववंशी (२०, रा. मानकापूर) या कॉलेज तरुणाची प्रेमसंबंधातून हत्या करण्यात आली. या घटनेत आरोपींनी अमन ध्रुववंशी या तरुणाला भेटण्याच्या बहाण्याने बोलावले आणि गोरेवाडा जंगल परिसरात त्याची निर्घृण हत्या केली. ही घटना शनिवारी रात्री घडली असून रविवारी दुपारी एका आरोपीने पोलिस ठाण्यात जाऊन गुन्हा कबुल केला. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात चौघांना ताब्यात घेतले आहे.

खापा येथील गांधी चौकात चेतन अशोक गागटे (३१, रा. हनुमान घाट) याच्यावर रविवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास भरदिवसा सिनेस्टाईल पाठलाग करत गोळीबार केला. त्याच्यावर आरोपी अर्जुन निळे याने तीन गोळ्या झाडल्या. त्यात चेतनचा मृत्यू झाला. गोळीबार नंतर आरोपी अर्जुनने स्वतः पोलिस स्टेशनमध्ये जाऊन आत्मसमर्पण केले. जुन्या वादातून ही हत्या झाल्याची चर्चा आहे. मात्र या हत्येमागचा नेमका उद्देश मात्र अद्याप समोर आला नाही. पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

नागपुरातील कुही तालुक्यातील पाचगाव भागात एक हत्येची घटना घडली. चौकीदाराची नोकरी करणाऱ्या सुमंतलाल मरस्कोल्हे याचा हातपाय बांधून निर्घृण खून करण्यात आला. कळमना-उमरेड मार्गावरील एका बांधकाम स्थळावर हत्येची ही घटना घडली. त्या ठिकाणी कामावर असलेल्या तीन मजुरांनीच हा खून केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र येतील असं मला वाटत नाही

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र आले त्यांनी ताकद वाढेल. याबाबत भास्कर जाधव आणि वक्तव्य केले असून याबाबत भुजबळ यांना विचारले असता भुजबळ म्हणाले की, दोघेही एकत्र आले तरी भाजपल फरक पडणार नसून राज ठाकरे व उद्धव ठाकरे हे एकत्र येतील असे काय मला वाटत नाही.जर दोन नेते एकत्र आले तर नक्कीच बळ वाढेल. त्यामुळे राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र आले तर नक्कीच ताकद वाढेल व किती प्रमाणात वाढेल हे काही सांगता येत नाही. अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांना माध्यमांशी बोलताना दिली.

छगन भुजबळ यांची माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया



यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, पालकमंत्री बाबत पेपर मधील बातम्या चुकीच्या असून नाशिकच्या पालकमंत्री बाबत मी कुठलाही आग्रह धरलेला नसल्याचे मंत्री छगन भुजबळ म्हणाले.

राज ठाकरेंच्या राजकारणातील अपेक्षाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.याबाबत भुजबळ यांना विचारले असल्यामुळे भुजबळ मिळाले की, त्यांना सर्वजण शुभेच्छा देतात आम्ही मी सुद्धा त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण होत राजकारणातील अपेक्षा देखील पूर्ण होईल अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी दिली. प्रत्येकाला आपला पक्ष वाढवण्याचे मुभा आहे. शरद पवार गटातील अनेक लोक आमच्याकडे येण्यास इच्छुक असल्याचे गिरीश महाजन म्हणताय याबाबत भुजबळांना विचारले असता भुजबळ म्हणाले की प्रत्येक पक्षाला आपला पक्ष वाढवण्याची मुभा आहे. अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी दिली.

## सराईत शटर फोडी करुन चोरी करणारा आरोपी अटक



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सिडको पोलीस ठाणे अंतर्गत युनीयन बैंक, एन-८, सिडको नेहरु गार्डन रोडवर श्रीराम सुपर शॉपी नावाचे किराणा मालाचे दुकानाचे शटर उघडून चोरी करणाऱ्याला सिडको पोलिसांनी केली अटक. शहरामध्ये रात्रीच्या सुमारास एक रिक्षा चालक रिक्षा घेऊन फिरत असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर रिक्षाचा व आरोपीचा पोलिसांनी शोध सुरु केला. सिडको पोलीस स्टेशनचे विशेष पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी नमुद आरोपीचा शोध घेतेला असता, तो आरोपी हा रिक्षा क्र. -२०--५४३९ अशी घेवुन चिस्तीयाचौक रोडवर उभा मिळुन आला. त्यास जागीच पकडुन पोलीस स्टेशनला विचारपूस केली असता, त्यांनी सांगितले दुकान फोडी चोरी केली. त्याने गुन्हा केल्याची उघडकी झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक अनिल नाणेकर यांनी दिली आहे.

## 'मला हिंदुस्थानी, मुस्लीम असल्याचा गर्व' : आमिर खान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आमिर खानचा 'सितारे जमीन पर' हा चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे. आमिर खान चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. अभिनेता त्याच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याशी संबंधित गोष्टी चाहत्यांसोबत शेअर करत आहे. अलिकडेच आमिर खान 'आप की अदालत'मध्ये उपस्थित होता. इथे त्यानं पहलगाम हल्ला आणि धर्माबद्दल परखड भाष्य केलं आहे. यावेळी त्यानं मला मी मुस्लिम असल्याचा गर्व आहे, असं म्हटलं आहे. पण त्यासोबतच मी हिंदुस्थानीही आहे आणि मला गर्व आहे की, मी हिंदुस्थानी आहे, असं म्हटलं आहे.

''संपूर्ण जगानं हे समजून घेतलं पाहिजे की, सुरुवात त्यांनी केलेली. त्यांनी आमच्या लोकांना मारलं. ही काय पद्धत? हा मानवतेवर हल्लाय. त्यांनी केलेल्या कृत्याची त्यांना लाज वाटली पाहिजे. कोणताही धर्म निष्पाप लोकांना मारण्यास सांगत नाही. मी दहशतवाद्यांना मुस्लिमही मानत नाही. इस्लाममध्ये असं लिहिलंय की, तुम्ही महिलांवर हात उचलू शकत नाही, तुम्ही मुलांना मारू शकत नाही. तुम्ही कोणत्याही निष्पाप व्यक्तीला मारू शकत नाही. हे सर्व इस्लामच्या विरोधात आहे.''

''मला आपल्या सैन्याचा अभिमान आहे. जेव्हा कारगिल युद्ध झालं आणि आम्ही ते जिंकलं, तेव्हा मी एकमेव व्यक्ती होतो (माझ्या माहितीनुसार) ज्यानं कारगिलमध्ये ८ दिवस घालवले आणि मी सर्वांना (रेजिमेंट्सना) भेटलो. मी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गेलो होतो.''

आमिर खानसाठी धर्म म्हणजे चेष्ठा?

आमिर खानला प्रश्न विचारण्यात आला की, त्याच्यावर आरोप आहे की, मुस्लिम धर्माची तो खिल्ली उडवतो, चेष्ठा करतो? एकीकडे तो फिल्म्समध्ये हिंदू धर्माची चेष्ठा करतो आणि दुसरीकडे त्याच फिल्ममध्ये लव्ह जिहादला प्रमोट करतात. यावर बोलताना आमिर खान म्हणाला की, ''आमिर खान म्हणाला की, मी प्रत्येक धर्माचा सन्मान करतो. मी फिल्ममध्ये हिंदू धर्माचा अपमान केलेला नाही. मी त्या लोकांवर प्रश्न उपस्थित केले, जे धर्माच्या नावावर फायदा उठवत आहेत.''

आमिर खाननं त्याची बहीण आणि मुलीचं लग्न हिंदू धर्मात केलेलं, त्यामुळे आमिर खानला मुस्लिम सपोर्टर ट्रोल्स काफिर म्हणून संबोधतात. तसेच, गजनीपर्यंत आमिर ठीक होता, पण त्यानंतर तो विसरुन गेला की, तो एक मुस्लिम आहे. यावर उत्तर देताना आमिर खान म्हणाला की, ''असं नाही... मी मुस्लिम आहे आणि मला गर्व आहे की, मुस्लिम आहे. पण, मी हिंदुस्थानीही आहे आणि मला खूप गर्व आहे मी हिंदुस्थानी असल्याचा. दोन्ही गोष्टी आपापल्या जागेवर योग्य आहेत.''

# मनसे हा वेगळ्या विचारांचा पक्ष : उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** मनसे हा वेगळ्या विचारांचा पक्ष आहे. राज ठाकरे स्वाभिमानी त्यांचा एक वेगळा विचार आहे.उद्धव ठाकरे सेनेने ज्या काही अटी घातल्या त्या अटी राज ठाकरे मान्य करतील असं मला वाटत नाही. फडणवीस यांची भेट घेऊन त्यांनी करून दाखवल. राज ठाकरे यांनी त्यांची दिशा स्पष्ट केली आहे. अशी प्रतिक्रिया मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, जिल्ह्यातील पावसाच्या नुकसानीची माहिती घेतली आहे. जिल्हाधिकाऱ्यांशी देखील चर्चा केली आहे. प्रशासन त्यांचं काम करत आहे.शेतकरी कर्जमाफी आश्वासनाबाबत बाकीचे मंत्री काय बोलले यापेक्षा मी काल जाऊन जे पत्र दिले ते महत्त्वाचे आहे. ते शासनाच्या वतीने दिलेलं पत्र आहे. शेतकरी कर्जमाफी करत असताना उच्चस्तरीय कमिटी नेमली जाईल. त्याचा अहवाल आल्यानंतर निर्णय घेतला जाईल.कोणाला कर्जमाफी द्यायची हे समितीचा अहवाल ठरवेल. मी सामन्याचा वाचक नाही. मनसे हा वेगळ्या विचारांचा पक्ष आहे. राज ठाकरे स्वाभिमानी त्यांचा एक वेगळा विचार आहे.उद्धव ठाकरे सेनेने ज्या काही अटी घातल्या त्या अटी राज ठाकरे मान्य करतील असं मला वाटत नाही. फडणवीस यांची



भेट घेऊन त्यांनी करून दाखवल. राज ठाकरे यांनी त्यांची दिशा स्पष्ट केली आहे.भरत गोगावले यांना माहिती कुठून मिळाली याबद्दल मला माहिती नाही.भरत गोगावले यांना ही माहिती कुठून मिळाली याची मी विचारणा करेन.

मोखाडा घटना संदर्भात मी स्वतः प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा केली आहे.यासंदर्भात ते पुढच्या आठवड्यात बैठक लावतील. अशी माहिती उपमुख्यमंत्री मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# जल जीवन मिशन अंतर्गत प्राप्त झालेल्या तक्रारी निकाली काढा

## राज्य पानी व सुरक्षा मिशनच्या अधिकाऱ्यांचे सीईओंना निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये अनेक प्रकारची गैरप्रकार झाला असून त्या संदर्भात दाखल तक्रारीनुसार जलजीवन मिशन योजनेच्या कामाची चौकशी करावी असे निर्देश राज्य पाणी व सुरक्षा विभागाचे कक्ष अधिकारी प्रियंका चमले यांनी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. राज्य पाणी व सुरक्षा विभागाचे कक्ष अधिकारी यांनी बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निर्देशात नमूद केले आहे की, ३० में २०२५ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीमध्ये बुलडाणा जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने स्वीकारलेले चुकीचे अंदाजपत्रक तसेच शासनाच्या नियम व अटी शर्ती धाब्यावर बसून नियमचाह्य पध्दतीने दिलेली कंत्राटदारांना तक्रारी करण्यात आली आहे.त्याचबरोबर जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी विविध ठिकाणाहून प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने जल जीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामाची सखोल चौकशी करून मुद्देनिहाय अहवाल या कार्यालयास व परस्पर तक्रारदारास सादर करावा, तसेच अर्जदार यांनी केलेल्या तक्रारींचे निराकरण आपले स्तरावरुन करण्यात यावे, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### जलजीवन मिशन योजना अनेकांसाठी ठरली कुरण

जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करून पाणीटंचाई निवारण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. मात्र, जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजना ही अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदारासाठी भ्रष्टाचाराचे कुरण ठरली आहे.या योजनेत गावागावात प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली असून अपवाद वगळता एकाही गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही. त्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च झाला असून शासनाच्या उद्देशालाही तडे गेल्याचे चित्र मेहकर लोणार मतदारसंघात संपूर्ण जिल्ह्यात दिसून येत आहे.



### मुंबईतील अमेरिकन महावाणिज्य दूतावास कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील अमेरिकन महावाणिज्य दूतावास कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. ही माहिती मिळताच महावाणिज्य दूतावास कार्यालयाने पोलिसांना माहिती दिली. मुंबई पोलिसांनी यानंतर सखोल तपासणी केली. पण काहीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. अखेर मुंबई पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात धमकी दिल्याचा गुन्हा नोंदवला आणि तपास सुरू केला आहे.

याआधी ३१ जून रोजी मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलला धमकीचा फोन आला होता. हॉटेल प्रशासनाने पोलिसांना माहिती दिली होती. पोलिसांनी सखोल तपासणी केली पण कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. यानंतर मुंबई पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात धमकी दिल्याचा गुन्हा नोंदवला आणि तपास सुरू केला.

मुंबईतील अमेरिकन महावाणिज्य दूतावास कार्यालय आणि ग्रँड हयात हॉटेल या दोन्ही प्रकरणांमध्ये धमकीचा फोन सर्वात आधी ज्या ठिकाणी आला त्या नंबरचे कॉल रेकॉर्ड तपासण्याचे काम सुरू असल्याचे समजते. या कॉल रेकॉर्डआधारे पोलीस तपास करत आहेत.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्षपदी गोपाल आखाडे यांची नियुक्ती




दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महेबुब शेख यांनी पक्षाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी गोपाल आखाडे यांची १४ जून रोजी नियुक्ती केली आहे. नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मान्यतेने व शरदचंद्र पवार राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत आहे. पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार च्या माध्यमातून युवकांच्या विकासात आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा व्यक्त करीत गोपाल सुभाषराव आखाडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी प्रतिक्रिया देताना महाराष्ट्र राज्याचे कुशल राजकारणी तथा पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या पक्षात व त्यांच्या नेतृत्वात तसेच प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख. पंकज पळसकर यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करत पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचून पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात सर्वसामान्यांना न्याय देण्यात येणार असल्याचे प्रतिक्रिया नवनिर्वाचित अध्यक्ष गोपाल आखाडे यांनी व्यक्त केली शरद चंद्र पवार राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्षपदी गोपाल आखाडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल जिल्ह्यात आनंद व्यक्त केला जात असून त्यांच्या नियुक्तीचे उस्फूर्त स्वागत केले जात आहे.

# १०५ हुतात्म्यांनी रक्त सांडून मिळालेली मुंबई व्यापाऱ्यांच्या हाती जाऊ देऊ नका

## उद्धव ठाकरेंचे भावनिक आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या मुंबईतील शाखा प्रम ुखांची शिवसेना भवन येथे बैठक पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे शाखा प्रमुखांना मार्गदर्शन केलं. आगामी म हानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर ही महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली होती. ठाकरे गटाने विधानसभा निहाय बैठका घेतल्या असून, विभागप्रमुखांचीही बैठक सेना भवन येथे बोलावण्यात आली होती. यावेळी उध्दव ठाकरेंनी पक्षातील सर्वांना मार्गदर्शन केलं. त्याचबरोबर दोन व्यापाऱ्यांना आणि भाजपला मुंबई महानगरपालिका ताब्यात घ्यायची आहे, त्याच्यामध्ये उद्धव ठाकरे आहे, उद्धव ठाकरे आणि आपल्या पक्षाला संपवून त्यांना महानगरपालिका ताब्यात घ्यायची आहे पण त्याच्यामध्ये आपण आहोत. मुंबई आपली आई आहे ती विकू देऊ नका. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १०५ हुतात्मानी रक्त सांडलं, तेव्हा मुंबई आपल्याला मिळाली. ती मुंबई व्यापाऱ्यांच्या हातात जाऊ द्यायची नाही, असं म्हणत मुंबई महापालिका जिंकण्यासाठी कामाला लागण्याच्या सूचना उध्दव ठाकरेंनी दिल्या आहेत.

दोन व्यापाऱ्यांच्या हातात मुंबई म हानगरपालिका द्यायची नाही. त्यासाठी आतापासून काम करा, विधानसभेत जे झालं ते महानगरपालिकेत होऊ द्यायचं नाही. माझा विरोध हा गुजरात्यांना नाही, तर जे दोन व्यापारी केंद्रात बसून म हानगरपालिका घ्यायचं बघतायत त्यांना माझा विरोध आहे. सत्ताधारी प्रचंड पैसा वाटत आहेत, काहीजण पैशांसाठी जात आहेत. पण माझी भूमिका ठाम आहे. मी पण पैसे घेऊन गेलो असतो पण मी यांच्याविरोधात लढायचं ठरवलं आहे, या लोकांना मुंबईला संपवायचं आहे. ते आपण होऊ द्यायचं नाही, असंही पुढे उध्दव ठाकरेंनी म्हटलं आहे.

७ वर्षानंतर मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होत आहे. पुन:श्च एकदा मुंबई महानगरपालिकेवर आपला भगवा फडकविण्याच्या इर्षेने आपण कामाला लागायचे आहे. त्यासाठी संघटना बांधणी अत्यंत महत्वाची आहे.

# जोपर्यंत वक्फ कायदा रद्द होणार नाही तो पर्यंत आंदोलन करणार

## महेफुज रहेमानी यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** वक्फ सुधारणा कायदा २०२५ रद्द करावा, अशी मागणी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड ने केली आहे. याच अनुषंगाने १५ जून रोजी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोर्डा चे सचिव उमरेन महफूज रहेमानी यांनी स्पष्ट भूमिका मांडली की, १९९५ चा मूळ वक्फ कायदाच कायम ठेवण्यात यावा. जोपर्यंत वक्फ कायदा रद्द होणार नाही तो पर्यंत आंदोलन करणार असा इशारा महेफुज रहेमानी यांची पत्रकार परिषदेत दिला. यावेळी वहदते इस्लामीचे राष्ट्रीयध्यक्ष जियाउद्दीन सिद्दीकी, मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डचे सदस्य रफिउद्दीन अशरफी ,बोर्डचे जिल्हाध्यक्ष मुफ्ती इनामउल्लाहखान, सचिव रसुल पटेल , प्रसिद्धी प्रमुख सलमान अशर , फिरोज अन्सारी , ताहेर मिर्झा , शाहरुख पठाण सह इतर मान्यवर यावेळीउपस्थित होते. यावेळी रहेमानी म्हणाले की, वक्फ बद्दल अनेक गैरसमज आहेत .वक्फ आणि बोर्ड यात फरक आहे. वक्फ धर्माशी जोडलेले आहे. तर, बोर्ड शासनाने व्यवस्थापनासाठी निर्माण केलेली संस्था आहे. वक्फ केलेली संपत्ती चा मालक अल्लाह आहे. ते शेवटपर्यंत अल्लाहचीच संपत्ती असते त्याला विकता किंवा परत घेता येत नाही.वक्फ हा शब्द दान करण्याच्या अर्थाने वापरला जातो. मुस्लिम समाजाच्या प्रगतीसाठी आणि धार्मिक कार्यांसाठी आजवर असंख्य जमिनी अल्लाहच्या नावाने वक्फ म्हणून दान करण्यात आल्या आहेत. या जमिनी सरकारी नसून, मुस्लिम समाजाने स्वेच्छेने दान केलेल्या मालमत्ता आहेत, ज्यांचा



उपयोग मस्जिद,मदरसा, कब्रस्तान, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक कल्याणकारी कार्यांसाठी केला जातो. मात्र, नव्या सुधारित कायद्यात सरकारने तब्बल ४४ नवीन तरतुदी घालून वक्फ संस्थांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केले आहे. रहेमानी ते पुढे म्हणाले की, नवीन कायद्यानुसार जर वक्फची जमीन वक्फ म्हणून मान्य करायची असेल, तर त्याबाबतचे सर्व दस्तऐवज संबंधितांकडे असणे आवश्यक आहे. अन्यथा अशी जमीन सरकार आपल्या ताब्यात घेऊ शकते. विशेष म्हणजे, मुस्लीमेतर व्यक्ती ने वक्फ साठी जमीन दिली असेल, तर तीही अमान्य ठरणार आहे. याशिवाय, नवीन कायद्यानुसार लिमिटेशन अक्ट वक्फ संस्थांवर लागू होणार आहे. त्यामुळे १२ वर्षांहून अधिक काळ एखाद्याने वक्फ जमिनीवर अतिक्रमण असल्यास त्याला ती जमीन मिळवण्याचा अधिकार प्राप्त होईल हे अतिशय अन्यायकारक असल्याची टीका रहेमानी यांनी केली. या कायद्यानुसार वक्फ बोर्डीमध्ये इतर धर्मीय सदस्य सामील करणे, आणि बोडीची समितीही सरकारच्या नियमानुसार गठित करणे अनिवार्य करण्यात आले आहे.जे पूर्ण घटनाविरोधी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. याच पार्श्वभूमीवर अकरा एप्रिलपासून देशभरात या कायद्याच्या विरोधात आंदोलन सुरू आहे.हे आंदोलन १३ जुलै पर्यंत चालणार असून सरकारने या काळात कायदा मागे घेतला नाही तर जुलै नंतर आंदोलनाचा दुसरा टप्पा अधिक तीव्र स्वरूपात करण्यात येईल, असा इशारा देत ,जोपर्यंतहा कायदा रद्द होणार नाही तोपर्यंत मुस्लिम पर्सनला बोर्ड संविधानिक मार्गाने आंदोलन करत राहील असे रहमान यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## विविध वृत्त...

### बळीराजा पॅनेल हा गोरगरीब लोकांचा पॅनेल : सुप्रिया सुळे यांचे प्रतिपादन



दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** ही लोकशाही आहे, हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. बळीराजा पॅनेल हा पक्षाचा पॅनेल नाही, हा गोरगरीब लोकांचा पॅनेल आहे. असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी कारखाना निवडणुकी संदर्भात माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी त्या म्हणाल्या की, अजित पवार बैठकीबाबत मला काही माहीत नाही.काहींनी मला फोन करून निवडणूक लढत असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आम्ही त्यांना इथे त्यांना साथ देणार आहोत. कारखान्याला चांगला भाव मिळावा, पारदर्शक पणे इथला कारभार चालावा, यासाठी आम्ही काम करणार आहोत. माळेगाव कारखाना निवडणूक् आम्ही पूर्ण अभ्यास करून बसलो आहोत, मी कधीच या निवडणुकीत लक्ष घातले नव्हते. त्यांनी आम्हाला सांगितले म्हणून आम्ही त्याला पाठिंबा देत आहोत. अजित पवार वक्तव्य ही लोकशाही आहे, त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### भाजपने जनतेचा छळ केला आनंद दुबे यांचा आरोप




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपने जनतेचा छळ केला आहे. सर्व स्तरावर भाजप अपयशी ठरली आहे. शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत. त्याला भाजप जबाबदार आहेत.असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते आनंद दुबे यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे.यावेळी ते म्हणाले की, मनसे आणि शिवसेना उबाठा गटाचे एकच मत आहे की, मराठी माणसासाठी काम करायचंय आणि मुंबईकरांसाठी काम करायचंय आहे.आमच्याकडे कोणतेही मतभेद नाहीत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन प्रमुख नेते चर्चा करून निर्णय घेतील. लोकांची काय इच्छा आहे हे महत्वाचं आहे.जनतेची इच्छा आहे की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावे, भाजपने जनतेचा छळ केला आहे. लाडकी बहिणीचे पैसे वेळेवर देत नाही, युवकांना रोजगाराची संधी नाही, शेतकरी आत्महत्या या सगळ्या मुद्द्यावर महायुती सरकार फेल झाली आहे. या महायुती सरकारचा सामना करण्यासाठी दोन्ही ठाकरे एकत्र आले तर, चांगलं आहे. असे मत शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते आनंद दुबे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी कॅनडासह ३ देशांच्या दौऱ्यावर रवाना



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑपरेशन सिंदूरनंतर पहिल्या परदेश दौऱ्यावर रवाना झाले आहेत. या पाच दिवसांच्या दौऱ्यात ते तीन देशांना भेट देणार आहेत. यासाठी ते सकाळी रविवारी रवाना झाले आहेत. पहिल्यांदा नरेंद्र मोदी सायप्रसला भेट देणार आहेत. त्यानंतर कॅनडा आणि क्रोएशियाला जातील. या दौऱ्यात नरेंद्र मोदी विविध कार्यक्रमांम ध्ये सहभागी होतील. तसंच या दौऱ्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कॅनडामध्ये होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेत नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत. कॅनडामध्ये होणारी जी-७ शिखर परिषद जागतिक दक्षिणेतील महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर आणि प्राधान्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करेल, असे नरेंद्र मोदींनी रविवारी सांगितलं. दरम्यान, या तीन देशांच्या दौऱ्यापूर्वी, नरेंद्र मोदी म्हणाले की, ''कनानसकीस येथील शिखर परिषदेदरम्यान भागीदार देशांच्या नेत्यांशी संवाद साधण्यास उत्सुक आहे. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून शिखर परिषदेत सहभागी होत आहे.'' या दौऱ्यात नरेंद्र मोदी दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला पाठिंबा देणाऱ्या देशांचे आभार मानतील.